# प्रेसनोट

दि.१२/०४/२०२२

## राज्य उत्पादन शुल्क विभाग पुणे येथील लिपिकावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७,१२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३१ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक - उत्तम किसन धिंदळे, वय - ४५ वर्षे<br>पद - लिपिक, वर्ग – ३,<br>नेमणूक - अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, पुणे.<br>२) खाजगी इसम - विठ्ठल चव्हाण (अद्याप अटक नाही) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- ( पाच हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- (पाच हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- दि. ११/०४/२०२२

सापळा दिनांक :- १२/०४/२०२२.

ठिकाण :- राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी परमीटरूमचे लायसन्स प्रक्रियेसाठी राज्य उत्पादन शुल्क कार्यालयातून पोलीस कमिशनर ऑफीस व वाहतूक शाखेचे ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत त्या कार्यालयांना पाठविण्याचे पत्र देण्यासाठी लोकसेवक उत्तम धिंदळे यांना भेटले असता त्यांनी ५,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची दिनांक ११/०४/२०२२ रोजी पडताळणी केली असता तक्रारदार यांचेकडे परमीटरूमचे लायसन्सकामी राज्य उत्पादन शुल्क कार्यालयातून पोलीस कमिशनर ऑफीस व वाहतूक शाखेचे ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत त्या कार्यालयांना पाठविण्याचे पत्र देण्यासाठी लोकसेवक उत्तम धिंदळे यानी ५,०००/- रूपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम खाजगी इसम विठ्ठल चव्हाण याचेकरवी स्वीकारल्यावर लोकसेवक उत्तम धिंदळे यास रंगेहात ताब्यात घेण्यात आले असून बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक विजयमाला पवार तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.